**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार, दिनांक ३१ मे २०२४**

**ठळक बातम्या**

1. **पंतप्रधान नरेंद्र मोदींसह एकूण ९०४ उमेदवारांसाठी उद्या लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यात होणार मतदान.**
2. **पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षाला आजपासून प्रारंभ, नागपुरात अनेक अभिवादनपर कार्यक्रम.**
3. **नागपूरच्या अंबाझरी बायोडायव्हर्सिटी पार्कमध्ये मध्यरात्रीच्या सुमारास लागलेली आग नियंत्रणात.**
4. **विदर्भात वर्धा, नागपूर आणि चंद्रपूर इथं उद्या उष्णतेच्या लाटेसह वादळी पर्जन्यमान राहण्याचा हवामान खात्याचा ईशारा.**

*****

उद्या मतदान

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या ५७ लोकसभा मतदारसंघात उद्या मतदान होणार आहे. यामध्ये पंजाब आणि उत्तर प्रदेशातल्या प्रत्येकी १३, पश्चिम बंगाल नऊ, बिहार आठ, ओडिशा सहा, हिमाचल प्रदेश चार, झारखंड तीन, तर चंदीगढमधल्या एका जागेचा समावेश आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या सर्व टप्प्यांची मतमोजणी येत्या चार जून रोजी होईल. आंध्रप्रदेश आणि ओडिशातल्या विधानसभा निवडणुकांची आणि देशभरातल्या विविध राज्यात झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकांची मतमोजणी देखील चार जून रोजी, तर अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम विधानसभा निवडणुकीची मतमोजणी दोन जून रोजी होणार आहे. या टप्प्यात मुख्य उमेदवारांमध्ये पंतप्रधान आणि भाजप नेते नरेंद्र मोदी, भाजप नेते आणि केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग सिंग ठाकूर, यांच्यासह एकूण ९० उमेदवारांचं भवितव्य उद्या मतदान यंत्रात बंद होईल.

आदर्श आचारसंहिता

नवीन लोकसभा स्थापित झाल्याची अधिसूचना प्रसिद्ध होईपर्यंत आचारसंहिता कायम राहणार असल्याचं, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं स्पष्ट केलं आहे. आचारसंहिता शिथील होण्याच्या शक्यते संदर्भातल्या काही बातम्या माध्यमांवरून प्रसारित होत होत्या, त्या पार्श्वभूमीवर, आयोगानं ही बाब स्पष्ट केली. अत्यंत तातडीच्या असलेल्या प्रकरणांना आचारसंहितेत सूट देण्यासंदर्भात निवडणूक आयोगास शिफारस करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली छाननी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीन शिफारस केलेल्या एकोणसाठ प्रस्तावांवर केंद्रीय निवडणूक आयोगान आतापर्यंत निर्णय दिला असल्याचं, या बातमीत म्हटलं आहे. दरम्यान, विधान परिषदेच्या चार जागांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नाशिक आणि कोकण विभागात आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे.

## पदोन्नती

सरकारी कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याचे निकष घटनेत कुठेही नमूद केलेले नाहीत. सरकार आणि कार्यकारिणी पदोन्नतीचे निकष ठरवण्यास स्वतंत्र आहेत. त्यामुळे पदोन्नती हा कर्मचाऱ्याचा अधिकार नसल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयान दिला आहे. सरन्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्या. जेबी पार्डीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठान आपल्या निकालात म्हटलं आहे की, भारतातील कोणताही सरकारी कर्मचारी पदोन्नतीला त्याचा अधिकार मानू शकत नाही, कारण त्यासाठी संविधानात कोणतेही निकष दिलेले नाहीत. नोकरीचे स्वरूप आणि उमेदवाराचे अपेक्षित काम यावर अवलंबून पदोन्नतीच्या पदांवर रिक्त जागा भरण्याची पद्धत कायदेमंडळ किंवा कार्यकारिणी ठरवू शकते असं न्यायालयानं सांगितलं. तसेच पदोन्नतीसाठी स्वीकारलेले धोरण 'सर्वोत्तम उमेदवारांच्या' निवडीसाठी योग्य आहे की नाही हे ठरवण्यासाठी न्यायपालिका या प्रकरणाचे पुनरावलोकन करू शकत नाही. गुजरातमधील जिल्हा न्यायाधीशांच्या निवडीवरून सुरू असलेल्या वादांवर निकाल देताना खंडपीठानं  या गोष्टी नोंदविल्या आहेत.

## आषाढी यात्रा

आषाढी यात्रेसाठी येणाऱ्या वारकऱ्यांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यास संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी प्राधान्य द्यावं आणि सर्व यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवून दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडावी, अशा सूचना सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या आहेत. आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर त्यांनी काल अधिकारी वर्गासह पालखी तळांची आणि पालखी मार्गाची पाहणी केली, त्यावेळी ते बोलत होते. आषाढी एकादशी सोहळा येत्या १७ जुलै रोजी साजरा होणार आहे.

## नवनियुक्त उच्चायुक्त

मलेशिया आणि भारताचे संबंध पूर्वीपासून घनिष्ठ आणि सहकार्याचे असून येत्या तीन वर्षात उभय देशांमधील व्यापार २० अब्ज डॉलर वरुन २५ अब्ज  डॉलर इतका वाढविण्याच्या दृष्टीनं प्रयत्न सुरु आहेत. आगामी काळात मलेशिया भारताशी पर्यटन, विज्ञान व तंत्रज्ञान, क्रीडा आणि पाम लागवड या क्षेत्रात सहकार्य वाढविणार असून या दृष्टीने महाराष्ट्र हे राज्य मलेशियाकरिता सर्वात महत्वाचं असेल असं प्रतिपादन मलेशियाचे भारतातील नवनियुक्त उच्चायुक्त दातो मुजफ्फर शाह मुस्तफा यांनी मुंबई इथं केलं. गुंतवणूक, व्यापार आणि पर्यटन विषयक मलेशियाच्या शिष्टमंडळासह त्यांनी काल राज्यपाल रमेश बैस यांची  राजभवन, मुंबई इथं  भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते.

## अहिल्यादेवी होळकर जयंती

प्रशासकीय कौशल्यासाठी आजही ज्यांचे नाव आदराने घेतले जाते, अशा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची आज जयंती आहे. यानिमित्त राज्यात सर्वत्र अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी समाज माध्यमांवरून अहिल्याबाई होळकर यांना आभिवादन केलं

आहे. मुंबईत मंत्रालयात सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 300 व्या जयंती निमित्त आज नागपूर महानगरपालिका, नागपूर महावितरण, नागपूर विभागीय आयुक्त कार्यालय तसंच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, इथं अभिवादनपर कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. हुडकेश्वर रोडवरील अहिल्या मंदिर येथे असलेल्या त्यांच्या अर्ध्याकृती पुतळ्याला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती समितीचे सचिव महादेवराव पातोंड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. धनगर समाजातर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती "अहिल्या मंदिर" पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती समिती सौभाग्यनगर, हुडकेश्वर रोड, नागपूर इथं मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त भव्य बाईक रॅलीचं आयोजन करण्यात आलं. रॅली अहिल्यादेवी मंदिर परिसर ते म्हाळगीनगर चौक दरम्यान काढण्यात आली.

## बायोडायव्हर्सिटी पार्क-आग

काल रात्री सुमारे १ वाजेच्या सुमारास हिंगणा परिक्षेत्रातील अंबाझरी बायोडायव्हर्सिटी पार्क इथं अचानक आग लागली. ॲटॉमिक एनर्जी डेपो आणि आंबेडकर नगरच्या पाठीमागच्या भागात साधारण ३ ते ४ हेक्टर गवताळ परिसरात ही आग पसरली होती. वनपरिक्षेत्र, अग्निशमन दल आणि पोलिसांच्या मदतीनं रात्री ३ वाजता ही आग विझविण्यात आल्याचं वन परिक्षेत्र अधिकारी रीना राठोड यांनी आकाशवाणीशी बोलतांना सांगितलं. सततच्या वाढलेल्या तापमानामुळे किंवा इतर कारणांनी ही आग लागली असण्याची शक्यता असून, आगीच नेमकं कारण शोधून काढण्यासाठी पुढील तपास सुरु असल्याचं त्यांनी सांगितलं.

## बुडून मृत्यू

नागपूर जिल्हयातील कुही तालुक्यातील मटकाझरी तलावात, मौज-मस्ती करायला गेलेल्या तिघांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना आज घडली आहे. पोहायला गेले असताना खोल पाण्याचा अंदाज न आल्याने तिघांचा मृत्यू झाल्याची शक्यता आहे. यात एका 12 वर्षीय मुलाचा देखील समावेश आहे. मृत्युमुखी पडलेले तरुण नागपूरातील भरतवाडा आणि वाठोडा परिसरातील रहिवासी आहेत.

## पुरवणी परीक्षा

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र अर्थात दहावीच्या पुरवणी परीक्षा जुलै-ऑगस्ट मध्ये घेण्यात येणार आहेत. या परिक्षेसाठी ३१ मे पासून ऑनलाईन पद्धतीने आवेदन करता येणार असून ११ जुन ही अंतिम मुदत असणार आहे, असं महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नागपूर विभागीय मंडळाच्या सहायक सचिव कल्पना लांडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविलं आहे. www. maha hssc board .in या संकेतस्थळावर अर्ज करता येणार असून विद्यार्थ्यांना त्यांच्या माध्यमिक शाळांमार्फतच ही आवेदन पत्र भरता येणार आहेत. सर्व माध्यमिक शाळांनी ऑनलाईन आवेदन पत्र

भरण्यासाठी घालून दिलेल्या नियमांचं पालन करुन कार्यवाही करण्याचे निर्देश मंडळाकडून देण्यात आले आहे.

## हवामान

विदर्भात वर्धा, नागपूर आणि चंद्रपूर इथं उद्या उष्णतेच्या लाटेसह वादळी पर्जन्यमान राहण्याचा इशारा हवामान खात्यान दिला आहे. दरम्यान आज देखील नागपूर, वर्धा आणि चंद्रपूर इथं उष्णतेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला होता. येत्या 3 जून पर्यंत विदर्भात वादळी पर्जन्यमान राहू शकतं. उद्या आणि परवा पूर्व विदर्भातल्या बहुतांश जिल्ह्यात तर 3 जून रोजी संपूर्ण विदर्भात विजा वादळ, हलका पाऊस आणि सोसाट्याचा वारा अश्या एकूणच वादळी पर्जन्यमानाचा इशारा हवामान खात्यानं दिला आहे. गेल्या 24 तासात चंद्रपूर इथं  सर्वाधिक 45. 6 दशांश अंश  सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. याशिवाय वर्धा, भंडारा, गडचिरोली या ठिकाणी देखील तापमान 45 अंशांच्या घरात आहे. अमरावती आणि गोंदिया इथं तापमान 44 अंशाच्या घरात असून यवतमाळ आणि वाशिम इथं  तापमान 42 ते 43 अंश  आहे.  तर बुलढाणा इथं 39 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदविण्यात आलं. वाढलेल्या तापमानाचा त्रास होऊ नये म्हणून प्रशासनानं मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. दर अर्ध्या तासाने पाणी पिणे, घराबाहेर पडताना  छत्री,  टोपी,  पांढरा शेला, अथवा दुपट्ट्याचा वापर करणं,  हलके, पातळ आणि सच्छिद्र सुती, खादी, पांढऱ्या रंगाचे कपडे वापरणं  यांसह अशक्तपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम, चक्कर येणे आदी उन्हाचा चटका बसण्याची चिन्ह ओळखून नागरिकांनी उपाय योजना करावी असं सांगण्यात आलं आहे. दरम्यान  नागपुरात  गेल्या २४ तासात  ४४.६ इतक्या तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

## दुचाकी वाहन क्रमांक

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय नागपूर पूर्व इथं दुचाकी वाहनांच्या MH49-CH ही नोंदणी क्रमाकांची मालिका संपत असल्यानं  दुचाकी वाहनांसाठी MH49-CJ अशी नवीन मालिका दि.3 जून रोजी सुरू करण्यात येणार आहे. ज्या वाहन धारकांना आपल्या वाहनांसाठी या मालिकेतून आकर्षक अथवा पंसतीचा नोंदणी क्रमांक आरक्षित करावयाचा असेल त्यांनी विहीत नमुन्यातील अर्ज, पत्याचा पुरावा, फोटो ओळखपत्र, पॅनकॉर्ड आणि पसंतीचा नोंदणी क्रमांका साठीच्या उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर पूर्व यांच्या नावाने काढलेल्या राष्ट्रीयकृत बॅंकेच्या धनाकर्षासहीत कार्यालयात स्वत: ३ जून रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 2.30 या कालावधीत सादर करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

*****